29767
27/10/2020

जा.क्रं.जिपऔ/कृषि-12/विघयो/2020 /831
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक :- 20/10/2020

प्रति,

आय.टि.सेल
जिल्हा परिषद औरंगाबाद

**विषय :-** बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना सन 2020-21 साठी ऑनलाईन अर्ज सादर करणे बाबत जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रचार प्रसिध्दी देणे बाबत.

**संदर्भ :-** मा.कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मार्गदर्शक संचना दिनांक 01/10/2020

उपरोक्त् संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की,बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना सन 2020-21 साठी ऑनलाईन अर्ज सादर करणे बाबतची कार्यप्रणाली उपलब्ध झालेली असुन औरंगाबाद जिल्हयातील अनुसुचित जमातीच्या शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत प्रचार प्रसिध्दी होऊन जास्तीत जास्त् शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याची माहिती मिळावी या करिता जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर कार्यप्रणाली प्रसिध्द करावी.

**सोबत :-** कार्यप्रणाली.

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद

| औरंगाबाद जिल्हा परिषद | |
|---|---|
| सामान्य प्रशासन विभाग | |
| दिनांक 21 OCT 2020 | |
| विभागाचे नांव | सापृ ITCEL |
| आवक क्रमांक | |
| का.अ./ क.अ. | |
| उप मु.का.अ. | |
| अति मु.का.अ | |
| मु का.अ | |

Scanned with CamScanner

## बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु

बिरसा मुंडा कृषि क्रांती या योजनेतुन अनुसुचित जमाती प्रवर्गातील शेतकरी लाभार्थ्यांना शाश्वत सिंचन सुविधा उपलबध करुन देण्यासाठी बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना राबविण्यात येते. सन 2020-21 साठी योजनेस रु.303.64 लक्ष नियतव्यय मंजुर असला तरी 33% नुसार योजना राबविण्यास शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. या योजनेतुन नविन विहिर पॅकेज, जुनी विहिर दुरुस्ती पॅकेज, शेततळे अस्तरीकरण पॅकेज या पैकी एका पॅकेजचा लाभ शेतकऱ्यांना प्रदान करण्यात येतो. सन 2020-21 या वर्षासाठी या योजनेतुन लाभ घेण्यासाठी अर्ज मागविण्यात येत असुन इच्छुक लाभार्थ्यांनी **mahadbtmahait.gov.in** या महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करुन त्याची एक प्रत पंचायत समितीस स्तरावर सादर करण्याचे आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात येत आहे. योजनेची सविस्त्र माहिती, पात्रतेचे निकष, अर्ज करण्याचा सर्व तपशिल खालीलप्रमाणे देण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेशी संपर्क साधावा.

<table>
<tr><td>योजनेचे नाव व उदिष्ट</td><td colspan="2">1. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेद्वारे अनुसुचित जमातीच्या शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे.</td></tr>
<tr><td>पात्रतेचे निकष -</td><td colspan="2">1. बिरसा मुंडा कृषि क्राती योजना लाभासाठी अर्जदार हा अनुसुचित जमाती प्रवर्गातील असावा (जातीचे प्रमाणपत्र आवश्यक)<br>2. जमिनीचा 7/12 व 8 अ चा उतारा आवश्यक<br>3. वार्षिक उत्पन्न रु. 150000/- च्या मर्यादित असावे ( सन 2019-20 उत्पन्नाचा दाखला आवश्यक)<br>4. लाभार्थ्याची जमीन धारणा 0.20 हे ते 6 हेक्टरपर्यंत असावी ( नविन विहिरीच्या लाभासाठी किमान 0.40 हे. आवश्यक)<br>5. सामुहिक शेतजमीन किमान 0.40 हेक्टर धारण करणारे एकत्रित कुटुंब नविन विहिर या घटकाचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरतील.<br>6. आधार कार्ड असणे आवश्यक आहे.<br>7. ज्या लाभार्थ्यांनी शासकिय योजनेतुन नविन विहिरीचा लाभ घेतला असेल अशा व्यक्तीना या योजनेचा लाभ देय राहणार नाही.<br>8.अनुसुचित जमाती व्यतीरिक्त् इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांची निवड होणार नसल्याने त्यांनी अर्ज करु नये.</td></tr>
<tr><td rowspan="10">अनुदानाच्या बाबी</td><td>बाब</td><td>महत्तम अनुदान मर्यादा(रुपये)</td></tr>
<tr><td>• नविन विहिर</td><td>रु. 250000/-</td></tr>
<tr><td>• जुनी विहिर दुरुस्ती</td><td>रु. 50000/-</td></tr>
<tr><td>• इन वेल बोअरिंग</td><td>रु. 20000/-</td></tr>
<tr><td>• पंपसंच</td><td>रु. 20000/-</td></tr>
<tr><td>• विज जोडणी आकार</td><td>रु. 10000/-</td></tr>
<tr><td>• शेततळयाचे प्लास्टिक अस्तरीकरण</td><td>रु. 100000/-</td></tr>
<tr><td>• सुक्ष्म सिंचन संच</td><td>ठिबक रु.50000/- किंवा तुषार रु. 25000/- मर्यादेत</td></tr>
<tr><td>• पीव्हीसी / एचडीपीई पाईप</td><td>रु. 30000/-</td></tr>
<tr><td>• परसबाग</td><td>रु. 500/-</td></tr>
<tr><td>वरील बाबींचा लाभ पुढील पैकी एका पॅकेजच्या स्वरुपात देय राहील.</td><td colspan="2">1. नविन विहिर पॅकेज - नविन विहिर, पंपसंच, विज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक यासाठी एकूण रु. 03.05 ते 3.30 लक्ष.<br>2. जूनी विहिर दुरुस्ती पॅकेज - जूनी विहिर दुरुस्ती, पंपसंच, विज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक यासाठी एकूण रु. 1.05 ते 1.30 लक्ष.<br>3. शेततळयाचे प्लास्टीक अस्तरीकरण - शेततळयाचे प्लास्टीक अस्तरीकरण,</td></tr>
</table>

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| | पंपसंच, विजजोडणी आकार, तुषार किवा ठिबंक यासाठी एकूण रु. 1.55 ते 1.80 लक्ष<br>**4. इतर पॅकेज** - ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी शासकीय योजनेतुन विहिर घेतली असेल किंवा स्वखर्चाने विहिर बांधली असेल अशा शेतकऱ्यांना वीज जोडणी आकार, पंपसंच व सुक्ष्म सिंचन संच या घटकाचा लाभ देय राहील. |
| **अंमलबजावणी यंत्रणा व अधिक माहितीसाठी संपर्क** | कृषि विभाग, पंचायत समिती आणि कृषि विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद |

**कृषि विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद औरंगाबाद**

Scanned with CamScanner